संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# हा तर महासमस्यांना आमंत्रण देणारा निर्णय

मुख्यमंत्री महत्त्वाच्या फाइलींवर सह्या करत नाहीत अशी तक्रार राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे केली जात होती. जे महत्त्वाचे निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसला वाटत होते त्यातला एक निर्णय म्हणजेच पुणे महानगरपालिकेची हद्द वाढवण्याचा होता असे दिसते. आधीच हाताबाहेर गेलेला पुणे महानगराचा पसारा आणि त्यात पुन्हा नव्या पस्तीस नावांची भर घालून राज्यातली सर्वात मोठी महानगरपालिका करण्याची घाट राष्ट्रवादी काँग्रेसच्या आग्रहामुळे घातला गेला आहे. हा निर्णय कोणाच्या हितासाठी घेतला गेला हे सांगायला कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. तर केवळ पुणे ते बारामती अशा राजकीयदृष्ट्या वजनदार असलेल्या बिल्डरांचे किंवा जमीनमालकांचे उखळ पांढरे करण्याकरिता हा निर्णय घेतला गेला आहे. या हद्दीमध्ये आणखी गावे जोडली जाणार आहेत अशी घोषणा झाल्याबरोबर या नव्या गावांमधल्या जागांचे भाव धाडकन वाढले. शिवाय आताच्या पुणे महानगरपालिका हद्दीतील जागांच्या किमतींनाही नवी झळाळी प्राप्त झाली. पुणे महानगरपालिकेवर आपले वर्चस्व अबाधित राहावे असे अजित पवारांचे स्वप्न आहे. ती महानगरपालिका मुंबई महानगरपालिकेपेक्षा मोठी आहे. तिथला महसूल राज्यातला सर्वाधिक महसूल ठरला पाहिजे. एकदा का महानगरपालिका हद्दीत नव्या जागा जोडल्या गेल्या की राजकीय नेत्यांची आणि जमीनमालकांची भरपूर चांदी होणार आहे. सामान्य नागरिकाला यामुळे किती सोयीसुविधा मिळतील याचा कोणताही गंभीर विचार सरकारने केलेला नाही. उलट स्टँप ड्युटी आणि रेडीरेकनरच्या वाढीव किमतीतून सामान्य माणसाची लूटच होणार आहे. म्हणूनच कोणतेही विशेष कारण नसताना जनतेची कोणतीही मोठी मागणी नसताना किंवा कोणतेही आंदोलन झाले नसताना सरकारला पुणे महानगरपालिकेची हद्द वाढवण्याची उपरती का व्हावी, हे एक रहस्यच ठरते. परंतु काँग्रेस सरकारचे हे पूर्वीपासूनच धोरण राहात आले आहे. ज्या मूलभूत समस्या आहेत त्या सोडवायच्या नाहीत आणि मुठभर लोकांसाठी सगळी सत्ता राबवायची. अगदी याची शंभर उदाहरणे देता येऊ शकतात. आज एकूणच महाराष्ट्र काय किंवा देशातल्या सर्वच राज्यांमध्ये महानगरांची जी अवस्था झाली आहे ती पाहिली तर एका फार मोठ्या समस्येला सरकारच जन्म देत आहे. ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करायचे आणि आहे तीच शहरे फुगवायची. त्यातून नागरी समस्या वाढवत न्यायच्या. वीज, पाणी, रस्ते आरोग्य अशा महत्त्वाच्या समस्यांना सोडवण्यासाठी सरकारकडे कोणतीही उपाययोजना नाही. पण शहरे वाढवत नेण्याचा मात्र उपाय आहे. केवळ राजकीय हेतूने महानगरे निर्माण करण्याचा हा सरकारी प्रयत्न महासमस्यांना आमंत्रण देणारा आहे यात काही शंका नाही.

### मुठभर लोकांच्या भल्यासाठी

आजच पुणे शहराला अपुरा पाणीपुरवठा होतो. शहराच्या अनेक भागामध्ये मुंबईप्रमाणेच पाणी तुंबण्याचा प्रकार घडतो. रहदारीची तर इतकी विचित्र समस्या पुण्यामध्ये आहे की वाहनांच्या प्रदूषणाचा उच्चांकच पुणे महानगरात नोंदला जातो. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये महापालिकेची बससेवा एवढाच तो काही दिलासा देणारा भाग असतो. बाकी तिथली रिक्षा व्यवस्था म्हणजे प्रवाशांसाठी भुर्दंडच ठरतो. कोणीही मीटरप्रमाणे भाडे घेत नाही. रिंगरूट रेल्वेचा किंवा मेट्रो रेल्वेचा पाठपुरावा करण्याची सरकारची इच्छा नाही. पुण्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्याकरिता दोन ते अडीच तास लागतात. एवढ्या वेळात तर मुंबई-पुणे हा प्रवास पूर्ण होतो. पुण्याच्या कोणत्याही भागात तुम्ही गेलात तर तुम्हाला चौवीस तास पाणी उपलब्ध होणार नाही. अनेक वेळेला तर पुरेसा वीजपुरवठाही होत नाही. आजचे पुणेच समस्याग्रस्त असताना त्याच महापालिकेवर हा नवा बोजा टाकण्याचा उद्योग सरकारने का केला? असा प्रश्न निर्माण होतो. राज्यातली त्यातल्या त्यात मोठी आणि अधिक चांगले प्रशासन असलेली महापालिका म्हणून मुंबई महानगरपालिकेचा विचार होतो. आज तिलासुध्दा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. केवळ एक मोठी उद्योगनगरी, आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आणि तिथल्या लोकसंख्येची गरज अशा कारणांमुळेच महापालिकेला थोडा ज्यादा निधी उपलब्ध होतो आणि त्यातून मुंबईकरांची गरज भागवली जाते. तरीदेखील त्या जागतिक महानगरामध्ये मेट्रो रेल्वे यायला तब्बल पन्नास वर्षे जावी लागली. अजूनही इथली निम्मी जनता झोपडपट्टीत राहते. आजदेखील पावसाळ्यामध्ये पाणी तुंबण्याचे प्रकार घडतात. यावरून मोठी महानगरे हा काही नागरी जीवन सुखी करण्याचा सर्वोत्तम उपाय ठरू शकत नाही. हे सरकारने आणि जनतेनेदेखील लक्षात घ्यायला हवे. केवळ रोजगार आणि शिक्षणासाठी लोकांना महानगरांकडे धाव घ्यावी लागते.

### मोदींनाही महानगरे हवीत

एकीकडे देशपातळीवर छोटी राज्ये निर्माण करण्याची वकिली केली जाते. तर दुसरीकडे महानगरांचा फुगा फुगवून सरकार अनाठायी स्फोटक परिस्थिती निर्माण करीत आहे. महात्मा गांधीनीसुध्दा ग्रामस्वराज्याची कल्पना मांडून खेड्यातील व्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला होता. आज छोटी राज्ये निर्माण झाल्यामुळे स्थानिक लोकांना न्याय मिळतो. विकास कामे वेगाने होतात. अशी छोट्या राज्यांची फलश्रुती समोर असताना नरेंद्र मोदी यांनीसुध्दा आपल्या निवडणूक जाहिरनाम्यात शंभर महानगरे विकसित करण्याची घोषणा का करावी हे समजत नाही. याचा अर्थ ग्रामीण भागाच्या विकासासाठी जास्त कष्ट पडतात आणि मग महानगरे निर्माण झाली ती खेडी केवळ महापालिकांना जोडून द्यायची आणि आपल्या जबाबदारीतून मोकळे व्हायचे असा हा सरकारचा जबाबदारी टाळण्याचा दुर्दैवी प्रकार म्हणावा लागेल. ठाणे महानगरपालिका जी मुंबई महानगराच्या अगदी जवळ आहे तिथेसुध्दा अशी गावे आहेत की, जी महापालिका हद्दीत असूनही अत्यंत अविकसित आणि दुर्लक्षित असल्याचे पहायला मिळते. यावरून सरकारला दूरदृष्टीचे वावडे तर दिसते.शिवाय बुध्दीचे कौशल्य वापरून नियोजन करण्याची इच्छाशक्तीही दिसत नाही. महानगरे जन्माला घालण्यापेक्षा सर्व व्यवस्था असलेली छोटी-छोटी शहरेही अधिक नागरी जीवनाचा स्तर उंचावू शकतात आणि समस्यादेखील रोखल्या जाऊ शकतात. जी गोष्ट सहजपणे करणे शक्य असते फक्त त्यासाठी योग्य त्या दूरदृष्टीची गरज आहे. ते न करता झटपट विकासाचे स्वप्न पाहणाऱ्या योजना सरकार पुढे आणते आणि सामान्य जनतेची अडचण करते. मोदींचा महानगरे निर्माण करण्याचा निर्णय असो किंवा महापालिका हद्दीत नवी गावे जोडण्याचा महाराष्ट्राचा निर्णय असो. यामागे कोणतीही दूरदृष्टी नाही.